# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **21/01/2023**

**Brief of the work done :-**

वाशिम येथील सोने चोरीच्या प्रकरणातील आरोपींना अटक ; 2.5 लाखांचा मुद्देमाल जप्त.

## सोन्याची चोरी करणारे दोन बंगाली चोरटे गजाआड

### अडीच लाखांचे सोने हस्तगत; वाशीम शहर पोलिसांची कारवाई



**वाशीम**, दि. २० (प्रतिनिधी)

शहरातील एका सराफा व्यावसायिकाकडे कारागिर म्हणून करत असताना सोन्याची चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना पोलिसांनी जेरबंद केले. बंगाल राज्यातील शेख नूर आलम व मोहन निमई अशी अटकेतील चोरट्यांची नावे असून त्यांच्या ताब्यातून अडीच लाख रुपये किंमतीचे ५० ग्रॅम सोने हस्तगत करण्यात आले आहे.

पोलीस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, शहरातील सराफा व्यावसायिक आशीष चौधरी यांच्या सोन्या,चांदीच्या दुकानात शेख नूर व मोहन हे दोघे कारागीर म्हणून कामाला होते. दरम्यान, १२ ऑक्टोबर रोजी दुकानात कामासाठी आलेले ५० ग्रॅम सोने लंपास करुन पोबारा केला. अशी तक्रार आशीष चौधरी यांनी दिल्यावरुन पोलिसांनी गुन्हा दाखल करुन प्रकरण तपासात घेतले. या घटनेचा गुन्ह्याचा छडा लावण्याचे आव्हान लिलया पेलत शहर पोलिसांनी शेख नूर आलम यास वाशीम रेल्वे स्थानकावरुन तर दुसरा आरोपी मोहन याला कोल्हापूर येथून ताब्यात घेतले. अटकेतील चोरट्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्या ताब्यातून २ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ५० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह,उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पुजारी यांच्या मार्गदर्शनात ठाणेदाररफीक शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक रमाकांत खंदारे, लालमणी श्रीवास्तव, ज्ञानदेव म्हात्रे, रामकृष्ण नागरे, अनिल बोरकर यांनी केली.